सांगली जिल्हा परिषद,सांगली.

**स्थायी समिती सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत भाग-१**

**समिती सभागृह**

| | |
|---|---|
| **दिनांक २३ जून २०१५** | **सभेची वेळ दुपारी ०१.००वा.** |

| अ.क्र. | उपस्थित पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीम.रेश्माक्का उर्फ रशमक्का मदगोंडा होर्ती उर्फ होर्तीकर | अध्यक्ष,तथा सभापती स्थायी समिती, व जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती जि.प.सांगली |
| २. | मा. श्री.गजानन शिवलिंग कोठावळे | सभापती बांधकाम व आरोग्य समिती जि.प.सांगली |
| ३. | मा. सौ.मनिषा तानाजी पाटील | सभापती कृषि व पशुसंवर्धन समिती जि.प.सांगली |
| ४. | मा. सौ.उज्वला अशोक लांडगे | सभापती, समाजकल्याण समिती जि.प.सांगली |
| ५. | मा. सौ.पपाली यशवंत कचरे | सभापती, महिला व बालकल्याण समिती जि.प.सांगली |
| ६. | श्री.बसवराज सिदगोंडा पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| ७. | श्री.संजीवकुमार आबासाो सावंत | सदस्य स्थायी समिती. |
| ८. | श्री.फिरोज सिराज शेख | सदस्य स्थायी समिती. |
| ०९. | श्री.शांताराम (बापू) मोहनराव कदम | सदस्य स्थायी समिती. |
| १०. | श्री.हेमंत बालाजी पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| ११. | श्री.देवराज जनार्दन पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| १२. | श्री.रणधीर शिवाजीराव नाईक | सदस्य स्थायी समिती. |

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी | पद नाम |
|---|---|---|
| १. | मा.श्री.सतिश लोखंडे | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | मा.श्री.दिलीप पाटील | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३. | श्री.विक्रांत बगाडे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)तथा सचिव,स्थायी समिती. |
| ४. | सौ.शुभांगी पाटोळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५. | श्री.रविकांत अडसूळ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) |
| ६. | श्री.किरण जाधव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) |
| ७. | श्री.आर.जे.भोसले | कृषि विकास अधिकारी |
| ८. | श्री.राम हंकारे | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ९. | श्री.संजय सा.माळी | कार्यकारी अभियंता (बांध) |
| १०. | श्री.एस.जी.सादिगले | कार्यकारी अभियंता (ग्रापापु) |
| ११. | श्री.लोभा हवेलीकर | कार्यकारी अभियंता (छोपावि) |
| १२. | श्रीम.सुगता पुन्रे | शिक्षणाधिकारी (प्रा.) |
| १३. | सौ.निशादेवी वाघमोडे | शिक्षणाधिकारी (नि) |
| १४. | श्री.सचिन कवले | जिल्हा समाजकल्याण अधिकारी |
| १५. | श्री.उत्तम थोरात | उप अभियंता (भूजल) जिल्हा परिषद |
| १६. | श्री.जे.वाय.काळे | उपअभियंता, प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. (प्रतिनिधी) |
| १७. | श्री.सी.डी.सुतार | पशुधन विकास अधिकारी (प्रतिनिधी) |
| १८. | श्री.उत्तमराव वाघमोडे | गट विकास अधिकारी पंचायत समिती मिरज |
| १९. | श्री.संतोष जोशी | गट विकास अधिकारी पंचायत समिती विटा |
| २०. | श्री.ओमराज गहाणे | गट विकास अधिकारी पंचायत समिती जत |
| २१. | श्री.रमेश जोशी | गट विकास अधिकारी पंचायत समिती पलूस |
| २२. | श्रीम.दिपाली पाटील | गट विकास अधिकारी पंचायत समिती शिराळा |

| | | |
|---|---|---|
| २३. | श्री.संदिप पवार | गट विकास अधिकारी पं.स.क.महंकाळ |
| २४. | श्री.एस.व्ही.गाढवे | गट विकास अधिकारी पं.स. तासगांव |
| २५. | श्री.गोरख शेलार | गट विकास अधिकारी पं.स. कडेगांव |
| २६. | श्री.विजयसिंह जाधव | गट विकास अधिकारी पं.स. वाळवा |
| २७. | श्रीम.एम.डी.साळुंखे | गट विकास अधिकारी आटपाडी |
| २८. | श्री.आर.आर.वेदांत | शाखा अभियंता ग्रापापु |
| २९. | श्री.के.जी.मोरे | शाखा अभियंता छोपावि |
| ३०. | श्री.पी.पी.मेलगे | शाखा अभियंता,(यां) |
| ३१. | श्री.पी.पी.मुरगुडे. | क. अभियंता प्रधान मंत्री ग्राम सडक योजना |
| ३२. | श्री.डी.डी.चिमटे | विस्तार अधिकारी शिक्षणाधिकारी (मा.) |
| ३३. | श्री.ए.एच.जाधव | विस्तार अधिकारी शिक्षणाधिकारी (मा.) |
| ३४. | श्री.एस.एस.गोंधळी | प्र.सहा.भू.वै. ग्रापापु |
| ३५. | श्री.गणेश फड | कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जि.प.सांगली. |
| ३६. | श्री. फिरोज शेख | अधिक्षक सामान्य प्रशासन विभाग जि.प.सांगली. |
| ३७. | श्री.संतोष वीर | अधिक्षक जि.प.सांगली. |
| ३८. | सौ.शुभदा चिटणिस | लघुलेखक (निम्नश्रेणी), साप्रवि जि.प.सांगली. |
| ३९. | श्री.सुशांत पाटील | लघुलेखक (निम्नश्रेणी), शिक्षण विभाग जि.प.सांगली. |
| ४०. | श्री.पी.एच.जगताप | क.सहा. साप्रवि सभा शाखा जि.प.सांगली. |

## स्थायी समिती सभा संक्षिप्त कार्यवृतांत

जिल्हा परिषद, सांगली स्थायी समितीची सभा दिनांक२३/०६/२०१५ रोजी समिती सभागृह, जि.प.सांगली येथे संपन्न झाली. मा.श्रीमती रेश्माक्का होर्तीकर, सभापती स्थायी समिती तथा अध्यक्ष जिल्हा परिषद, सांगली यांनी सभेसाठी उपस्थित सर्व सन्मा.स्थायी समिती सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व खातेप्रमुख, गटविकास अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेस सूचित केले.

श्री.रणधीर नाईक सदस्य, यांनी सभेच्या सुरवातीस सभागृहात खालीलप्रमाणे दु:खवटयाचा ठराव मांडले, त्यास श्री. देवराज पाटील, सदस्य यांनी अनुमोदन दिले.

१) आटपाडी तालुक्यातील स्वाभिमानी आघाडीचे नेते व आटपाडीचे माजी सरपंच तसेच जिल्हा परिषदेचे माजी स्थायी समितीचे सदस्य रामभाऊ पाटील यांचे वयाच्या ४८ व्या वर्षी अल्पशा आजाराने दिनांक ०१/०६/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे.

२) येलूर गावचे जेष्ठ नेते व तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष,आमदार महादेवराव महाडीक, नानासाहेब महाडीक यांचे जेष्ठ बंधू तसेच जि.प.सदस्य सम्राट महाडीक यांचे चुलते पी.आर.महाडीक यांचे वयाच्या ७९व्या वर्षी अल्पशा आजाराने दिनांक १० /०६/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे.

३) जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्री.सुरेश आप्पासो पाटील,इनामधामणी ता.मिरज यांचे वडील आप्पासो सिदगोंडा पाटील यांचे वयाच्या ८४व्या वर्षी अल्पशा आजाराने दिनांक २२/०६/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे.

श्री.देवराज पाटील सदस्य, यांनी खालील प्रमाणे दुखवटयाचा ठराव सभागृहात मांडला. त्यास श्री.रणधीर नाईक,सदस्य यांनी अनुमोदन दिले.

४) येवलेवाडी फाटा येथे नेर्ले ता.वाळवा सेवा निवृत्ती उपशिक्षक श्री. एस.के.माळी, यांचा अज्ञात दरोडेखोरांच्या हल्ल्यामध्ये दुखद निधन झाले आहे.

त्या बददल ही सभा शोक व्यक्त करीत आहे व त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात सहभागी होत आहे. ईश्वर दिवगंताचे आत्म्यास शांती व सद्‌गती देवो अशी प्रार्थना करुन सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली वहाणेत आली.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) तथा सचिव स्थायी समिती यांनी विषय क्रं.०१ :-** मागील दिनांक २७.०५.२०१५ रोजीची तहकूब होवून दिनांक ३०.०५.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेसाठी सादर केला असता

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** भरती महिमा श्री.लोंढे या मथळयाखाली रोज बातमी वर्तमान पत्रामध्ये येत आहे. कायदयाचे नियम काटेकोरपणे पालन करुन सुध्दा त्यामध्ये कांही संस्थांची व शाळांची नांवे चूकीच्या पध्दतीने आलेली आहेत हे बरोबर नाही. कारजंगी, ता.जत येथे पूर्ण अल्पसंख्याक संस्था आहे सदरची संस्था अल्पसंख्याक असल्यामुळे याला रोष्टरचा प्रश्न येत नाही. तसेच संस्था अनुदानित आहे. कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक मान्यता घेतलेले आहे. तरीही या शिक्षकांची नांवे वर्तमान पत्रामध्ये आढळून आलेली आहेत. शिक्षण विभागाला शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावणेची सवय लागलेली आहे. १९९४ साली अल्पसंख्यांक कक्ष नसताना, शिक्षण उपसंचालकांना अधिकार होते. ज्या संस्थेचे सर्व कर्मचारीसह मान्य केलेले आहे. अल्पसंख्यांक कक्ष स्थापन होण्यापूर्वी मान्यता दिलेली आहे. तरीसुध्दा सदरची शाळा अनुदानितवर आणलेली नाही. शासन निर्णय समजत नाही. वेळोवेळी सांगितलेले आहे की, अपसंख्यांक कक्ष स्थापन होण्यापूर्वी जे सर्टिफिकेत दिलेले आहे ते ग्राहय धरावे. परंतू अल्पसंख्यांक कक्षाचे सर्टिफिकेट दिलेले नाही म्हणून शाळा अनुदानितवर आणले नाही. शेवटी पुन्हा एकदा अल्पसंख्यांक कक्षाचे सर्टिफिकेट मिळवावे लागले.महाराष्ट्र

शासनाच्या अल्पसंख्यांक आयुक्तांचे पत्र मिळविलेले आहे. १९९४ साली सर्टिफिकेट दिले ते मान्य नाही. मूल्यांकनात पात्र ठरवत नाहीत. शासन निर्णयाप्रमाणे कामकाज करणे आवश्यक आहे.

**याऐवजी** भरती महिमा श्री.लोंढे या मथळयाखाली रोज बातमी वर्तमान पत्रामध्ये येत आहे. कायदयाचे नियम काटेकोरपणे पालन करुन सुध्दा त्यामध्ये कांही संस्थांची व शाळांची नांवे चूकीच्या पध्दतीने आलेली आहेत हे बरोबर नाही. कागनरी, ता.जत येथे पूर्ण अल्पभाषिक संस्था आहे सदरची संस्था अल्पभाषिक असल्यामुळे याला रोष्टरचा प्रश्न कायद्यात येत नाही. तसेच संस्था विनाअनुदानित आहे. कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक मान्यता घेतलेले आहे. तरीही या शिक्षकांची नांवे वर्तमान पत्रामध्ये आढळून आलेली आहेत. माध्यमिक शिक्षण विभागाला शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावणेची सवय लागलेली आहे. १९९४ साली अल्पसंख्यांक कक्ष नसताना, शिक्षण उपसंचालकांना अधिकार होते. ज्या संस्थेचे सर्व कर्मचारी वैयक्तिक मान्यता केलेली आहे. अल्पसंख्यांक कक्ष स्थापन होण्यापूर्वी मान्यता दिलेली आहे. तरीसुध्दा सदरची शाळा अनुदानित तत्वावर आणलेली नाही. माध्यमिक शिक्षण विभागाला शासन निर्णय समजत नाही. वेळोवेळी सांगितलेले आहे की, अपसंख्यांक कक्ष स्थापन होण्यापूर्वी जे सर्टिफिकेत दिलेले आहे ते ग्राहय धरावे. परंतू अल्पसंख्यांक कक्षाचे सर्टिफिकेट दिलेले नाही म्हणून जाणूनबुजून चुकीच्या दृष्टीकोनातून शाळा अनुदानितवर आणले नाही. शेवटी पुन्हा एकदा अल्पसंख्यांक कक्षाचे सर्टिफिकेट मिळवावे लागले. महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक आयुक्तांचे पत्र मिळविलेले आहे. १९९४ साली सर्टिफिकेट दिले ते मान्य नाही. मूल्यांकनात जाणूनबुजून पात्र ठरविलेले नाही. ही बाब गंभीर असून शासन निर्णयाप्रमाणे कामकाज करणे आवश्यक आहे. कार्यवृतांतामध्ये असा बदल करुन इतिवृत कायम करणेत आले.

**विषय क्र.२:-** शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व परिपत्रकांचे वाचन करणे व

**विषय क्र.३:-** विषय समित्यांच्या मासिक सभांचे कार्यवृत्तांताचा व विभागाकडील कामकाजाचा आढावा घेणे

विषय क्र.२ व ३ सादर झालेनंतर,

<u>**वित्त विभाग**</u>

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** यांनी विभागाकडील आढावा सादर केला. या महिन्यात शासन निर्णय प्राप्त झाला नसल्याचे सांगितले. १३ वा वित्त आयोगाअंतर्गत जिल्हा परिषद स्तरावरील खर्च ७७%, पंचायत समिती स्तर- ६९%, व ग्रामपंचायत स्तरावरील ६०% खर्च झालेला आहे. तिन्ही स्तरावरील मिळून र.रु.१६७.८४ लाख प्राप्त पैकी र.रु.११२.७५ लाख खर्च झालेला आहे. र.रु.५५ लाख शिल्लक आहेत ते सप्टे.२०१५ अखेर खर्च करावयाचे आहेत. पूर्ण कामे जि.प.स्तर-७८%, पं.स.- ८७% व ग्रा.पं.स्तरावरील ९१ % कामे पूर्ण झालेली आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** मागील सभेमध्ये मुद्रणालयाकडील थकबाकी वसुली संदर्भात चर्चा झालेली होती. थकबाकी वसूल झाली कां?

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** मागच्या वर्षीच्या थकबाकी पोटी रु. ४ कोटी वसूल झालेले आहेत. चालू वर्षी जून २०१५ अखेर र.रु.१ कोटी १५ लाख मागणी पैकी र.रु. ५४ लाख वसूल झालेले आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** नगरपालिकेकडून जि.प.स येणे असलेल्या रक्कमा वसूली संदर्भात पुढे काय प्रगती आहे?

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** नगरपालिकेच्या मुख्याधिका-यांची या संदर्भात मा.अध्यक्षा, जि.प.सांगली यांचे अध्यक्षतेखाली मिटींग घेतलेली होती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** आष्टा नगरपालिकेने पैसे दिलेले आहेत. इस्लामपूर न.पा.ने प्रतिसाद दिलेला नाही.

**मा.श्रीमती रेश्माक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** मिटींगनंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी काय पाठपुरावा केला ते सांगावे.

**शिक्षणाधिकारी (प्राथ) :-** नगरपालिकांना शिक्षण वर्गणीची रक्कम देणेबद्यल पत्रे दिलेली आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी परत एकदा नगरपालिकांची बैठक घ्यावी. गट विकास अधिकारी, पं.स.वाळवा यांनी लगेच उद्या मुख्याधिकारी,न.पा. इस्लामपूर यांना बोलावून घेवून शिक्षण वर्गणी संदर्भात पाठपुरावा करावा.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** महानगरपालिकेकडूनही जि.प.स येणे रक्कम आहे तीही वसूल होत नाही. कुपवाड येथील शाळेच्या इमारती त्यांना दिलेल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (निरंतर) :-** म.न.पा.कडून र.रु. ३.२१ लाख घेणे आहेत. त्यांना याबाबत पत्र दिलेले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** महानगरपालिकेच्या संबंधीत अधिका-यांना उद्याच या संदर्भात बोलावून घेणेत यावे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** सर्व पंचायत समितीमध्ये चेकलेस सिस्टीम सुरु झाली कां?

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** सर्व पंचायत समितीमध्ये चेकलेस सिस्टीम सुरु झालेली आहे.

**<u>बांधकाम विभाग</u>**

**कार्यकारी अभियंता(इवद)** यांनी योजनानिहाय आढावा दिला. चालू महिन्यात शासन निर्णय प्राप्त नसलेचे सांगितले. स्विय निधीतील कामांचे काम वाटप प्रक्रिया सुरु आहे. स्थानिक विकास निधी तील कामांसाठी संबंधिताना पत्रे दिलेली आहेत. डीपीसी कडील कामांची यादी पाठविणेत आलेली आहे अद्याप मंजूरी मिळाली नाही. मार्च अखेरीस अपूर्ण कामे पूर्ण करणेचे नियोजन केलेले आहे व त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** आपण कांही कामे ग्रामपंचायतीकडून करुन घेतो. रु. ३ लाखाच्या वरील कामे ई टेंडरनी घ्यावी लागतात. पंचायत समिती स्तरावर ई टेंडरची प्रक्रिया लवकर होत नाही. ई टेंडरची प्रोसिजर पूर्ण होण्यामध्ये ५-५ महिने लागतात. शिराळा पं.स.कडील विशेष घटक योजनेमधील कामांचे ईटेंडर करणेसाठी ४ महिने गेलेले आहेत.

**गट विकास अधिकारी, पं.स.शिराळा:-** पं.स.स्तरावर बँक कोडींगचा प्रॉब्लेम होता त्यामुळे वेळ लागला आहे.

**कार्यकारी अभियंता(इवद):-** शासनाकडून वेगवेगळया मार्गदर्शक सूचना येतात. आता १-२ महिन्यात रेग्युलर सुरु होईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** आता सॉर्ट आऊट झालेले आहे. कांही प्रोब्लेम येणार नाही.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** स्टाफचा काय प्रॉब्लेम असेल तर तो दूर करावा.

**ग.वि.अ.पं.स.शिराळा:-** स्टाफचा कांही प्रॉब्लेम नाही.

**कार्यकारी अभियंता (इवद) :-** जि.प.कडील बांधकामा संदर्भात आपण सॉफ्टवेअर तयार करीत आहोत. कामाचा उगम झालेपासून ते पूर्ण होईपर्यंतच्या सर्व स्टेपवरील बांधकामाची स्थिती आपण वेबसाईटवर पाहू शकतो. तालुकानिहाय व लेखाशिर्षनिहाय कामांची विभागणी केलेली आहे. निविदा झाल्यानंतर वर्क ऑर्डर, त्यानंतर प्रत्यक्ष कामाची प्रत्येक स्टेज आपण पाहू शकणार आहोत. कामाचे प्रत्येक स्टेजच्या कामाचे फोटोही अपलोड करणार आहोत. एखाद्या उपअभियंतानी एक-दोन महिने एखादे काम कांहीच केले नाही तर तसा संदेश यातून आपल्याला मिळू शकतो.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** पुढील स्थायी समितीमध्ये या सॉफट्वेअरचे सादरीकरण करणेत यावे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** प्रोग्रेसमधील कामे असतील तर त्याचे किती दिवसात अपलोड करावयाचे आहे.

**कार्यकारी अभियंता (इवद):-** या सॉफट्वेअरमध्ये कामाची प्रत्यक्ष स्टेप ठरवून दिलेली आहे. त्यानुसार प्रत्येक स्टेपला अपलोड करावयाचे आहे. पुढील आठवडयात हे काम पूर्ण होईल. जि.प.कडील सर्व विभागाकडील बांधकामांचा यात समावेश असणार आहे.

<u>**ग्रामपंचायत विभाग**</u>

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):-** यांनी बाबनिहाय आढावा दिला. घरपट्टी वसुलीस स्थगिती असलेने वसुली झालेली नाही. पाणीपट्टी वसुलीची र.रु.२३ कोटी २८ लाख मागणी आहे पैकी रु. १४.६२ लाख वसूल झालेली आहे. मगांनरेगा अंतर्गत मागील आठवडयात १८७ गावांत ४१८ कामे सुरु असून ६२६१ मजूर काम करीत आहेत. माहे मे २०१५ अखेर र.रु. ५ कोटी ५६ लाख खर्च झालेला आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालयाचे ४१०६२ उद्दिष्ट असून मे २०१५ अखेर १९९१ उद्दिष्ट साध्य झालेले आहे. मागील महिन्यात विशेष मोहिम घेवून सन २०१५-१६ मधील मंजूर शौचालयांची बांधकामे सुरु केलेली आहेत. आदर्श शौचालयाचे ६२० उद्दिष्ट होते पैकी ३५३ शौचालये पूर्ण झालेली आहेत. मागील आठवडयात जी शौचालय नसलेली कुटुंबे बेसलाईन सर्व्हेमध्ये नाहीत अशी २५४८१ कुटुंबे आहेत. त्यांची माहिती शासनाकडे पाठविली आहेत. ती मंजूर होऊन आल्यानंतर त्यांचा समावेश बेसलाईन सर्व्हेच्या यादीत करता येणार आहे. सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सन २०१५-१६ साठी सर्व तालुक्यांकडून प्रस्ताव मागणी केलेले आहेत. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे भरणेची कार्यवाही सुरु आहे. प्रत्येक पदासाठी किती अर्ज प्राप्त आहेत त्यानुसार लेखी परीक्षा घ्यायची कि नाही हे ठरणार आहे. तीन पदांसाठी पांचपेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले आहेत.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** समडोळी येथील ग्रामसेवका संदर्भात पेपरला बातमी आलेली होती त्याबाबत माहिती द्यावी.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप.) :-** समडोळी येथील लाभार्थ्यांना शौचालयाचे पूर्ण पैसे दिले जात नसलेची तक्रार ग्रामस्थांनी केलेली होती. त्यानुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत समडोळी ग्रामपंचायतीस भेट देवून संबंधीत लाभार्थीना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. ग्रा.पं.ची दप्तर तपासणी केली. संबंधीत लाभार्थ्यांनी जे आरोप केलेले होते त्यामध्ये तथ्य दिसून आले. त्यामुळे संबंधीत ग्रामसेवक यांचेवर निलंबनाची कारवाई केलेली आहे. ग्रामपंचायत क्लार्कवर कारवाई करणेस ग्रामपंचायतीस सांगितले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत गृहभेटी देऊन शौचालय नसलेल्या कुटुंबांची माहिती घेणेत आली. त्यानंतर शौचालय बांधकामाची मोहिम घेतलेली होती. शौचालयाचे पैसे संबंधीत लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करणेबाबत सर्व संबंधीत ग्रामसेवकांना सूचना दिलेल्या होत्या. सूचना देऊनही समडोळी ग्रा.पं.कडील ग्रामसेवकांनी शौचालय मंजूर केलेल्या लाभार्थ्यांचे पैसे बँक खात्यात जमा न करता बेअरर चेक काढलेले होते.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** बेअरर चेक कोणत्याही ग्रामपंचायतीमध्ये निघणार नाहीत. याची दक्षता घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** इंआयो घरकुल, शौचालय, समाजकल्याणकडील शिष्यवृत्ती, कलाकार मानधन वगैरेचे पैसे संबंधीत लाभार्थ्याच्या खात्यावर जमा होतात.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** ग्रामपंचायतीचे ऑडीट कधी होते?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):-** सन २०१४-१५ चे ऑडीट पुढील वर्षी होईल. साधारणपणे दोन वर्षाचे ऑडीट एकाचवेळी करण्यात येते. ऑडीट प्रोग्रॅम स्थानिक निधी लेखा विभागाकडून कळविणेत येतो.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** कांही ग्रामसेवक चांगले काम करतात. पण कांही ग्रामसेवक जाणून बुजून कर वसुली जास्त केल्याचे दाखवितात. ज्यांनी खरोखरच वसुली केलेली आहे त्यांना फोकस केले पाहिजे पण तसे होत नाही.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):-** ग्रामपंचायत दप्तर तपासणी जास्तीत जास्त वेळा करुन यामध्ये सुधारणा करता येईल.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** ग्रामपंचायत तपासणीचे वेळी प्रत्यक्षात वसुली किती झाली आहे हे पाहू शकतील. मध्यंतरी ग्रामपंचायत दप्तर तपासणीची मोहिम घेतली त्यामध्ये ११४ ग्रा.पं.कडे गंभीर त्रुटी आढळल्या. यामध्ये सुध्दा सदरच्या ग्रामपंचायती या तीन तालुक्यातील जास्त आहेत. मिरज, पलूस व वाळवा या तालुक्यातील ग्रा.पं. गंभीर त्रुटी जास्त आढळलेल्या आहेत. कांही तालुक्यात कमी आहेत. संबंधीत तालुक्यातील विस्तार अधिकारी (ग्रापं) यांनी वेळोवेळी तपासणी केली नाही कां तपासणी करुनही या त्रुटी आढळल्या नाहीत? याबाबत त्यांना जाब विचारणार आहात की नाही? त्यांनाही कारणे दाखवा नोटीस द्यायला पाहिजे.

**उप मु.का.अ. (ग्रापं):-** ११४ ग्रामसेवकांपैकी ६२ लोकांना भरती करणेची प्रोसेस सुरु आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** बांधकाम विभागाप्रमाणे ग्रामपंचायतीकडील महत्त्वाचे रेकॉर्ड वेबसाईटवर प्रसिध्द करणेत यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** नाविन्यपूर्ण योजनेमध्ये ही बाब घेवून ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड वेबसाईटवर प्रसिध्द करणेची कार्यवाही करीत आहोत.

**महिला व बालकल्याण विभाग :-**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) :-** यांनी योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, ६०२ अंगणवाडींना इमारती नसल्याचे सांगितले. चालू वर्षासाठी अंगणवाडी इमारत बांधकामाचे १२९ उद्दिष्ट आहे. आतापर्यंत फक्त ६२ प्रस्ताव आलेले आहेत. ज्या प्राथ.शाळांमध्ये वर्ग खोल्या रिकाम्या आहेत त्या खोल्या अंगणवाडीसाठी दिलेल्या आहेत. जागा उपलब्ध नसलेल्या कांही ठिकाणी प्राथ.शाळेच्या आवारात जागा असेल तर त्या ठिकाणी अंगणवाडी इमारत घेतलेली आहे. त्यातूनही जागा नसलेल्या ४८१ अंगणवाडयांची यादी सर्व सन्मा.सदस्यांना दिलेली आहे त्यांनीही जागा उपलब्धतेसाठी प्रयत्न करावेत. ज्या ठिकाणी मोठया ग्रामपंचायती (निम शहरी भाग) आहेत त्या ठिकाणी जागा उपलब्ध होत नाहीत. कांही तालुक्यांमध्ये अंगणवाडी इमारत बांधकामास ठेकेदारांकडून प्रतिसाद मिळत नाही.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** जागा नसलेल्या ठिकाणी काय पर्याय काढणार आहात?

**उपमुख्य कार्यकारीअधिकारी (मबाक):-** नवीन अंगणवाडीसाठी जागा खरेदीसाठी अनुदान मागणीचा प्रस्ताव शासनाने नाकारलेला आहे. गायरानमध्ये जागा मिळू शकते परंतू गावांपासून १-१॥ कि.मी.लांब मुले येऊ शकणार नाहीत.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, सदस्य:-** मागणी नसतांना अंगणवाडी इमारत मंजूर कशी काय केली?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) :-** प्रथम अंगणवाडी मंजूर करणेत येते. त्यानंतर इमारती बांधकामाचा प्रश्न येतो. सद्यस्थितीत मिनी अंगणवाडया व मोठया अंगणवाडयांना शासनाने मंजूरी दिलेली नाही.

**ग.वि.अ.पं.स.जत :-** जत शहरात जागा उपलब्ध होत नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** अंगणवाडी इमारतीस जागा उपलब्ध होत नाही अशा अंगणवाडींची यादी बांधकाम विभागाकडे द्यावी.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)** :- आयएसओ अंगणवाडया ५७० पैकी २५७ झालेल्या आहेत. चालू वर्षासाठी आयएसओ मानांकन देणेसाठी संस्थेला ७५०० फी देणे ऐवजी तालुकास्तरावर कमिटी केलेली असून आपणच आयएसओ सर्टिफिकेट देणार आहोत.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती:-** अंगणवाडया आयएसओ करण्यासाठी आपण कांही मदत करणार आहोत कां?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक):-** जिल्हा नियोजन समिती कडे प्रस्ताव दिलेला होता परंतू तो त्यांनी नाकारला आहे. जि.प.स्वीय निधीतून जी १० टक्के तरतूद करणेत येते त्यातील ५०टक्के तरतूद प्रशिक्षणासाठी व ५० टक्के तरतूद योजनांसाठी करावी लागते. त्यामुळे आयएसओ अंगणवाडी लोकसहभागातूनच करावयाची आहे. रिक्त पदांची स्थिती पहाता, जिल्हयामध्ये बाल विकास प्रकल्प अधिका-यांची १३ पदे मंजूर आहेत पैकी १३ पदे रिक्त आहेत. शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. मिनी अंगणवाडयांकडे सेविकांची पदे भरणार आहोत. अंगणवाडी सेविका व मदतनीस ची रिक्त पदे भरणेत येणार आहेत. अंगणवाडी सेविकांसाठी १० वी पास व मदतनीस साठी ७वी पास अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. मेरीटनुसार निवड होईल. मुलाखती होणार नाहीत.

**<u>पशुसंवर्धन विभाग</u>**

**पशुधन विकास अधिकारी :-** यांनी योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये योजनानिहाय नियतव्यय मंजूर तरतूदीची माहिती दिली व निधी प्राप्त न झालेने खर्च झालेला नसलेचे सांगितले.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** उमदी येथील पशुवैद्यकिय दवाखान्याचे काम केंव्हा पूर्ण होणार?

**अतिरिक्त मु.का.अ.:-** कार्यकारी अभियंता (इवद) यांना अपूर्ण काम पूर्ण करुन घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** पेपरला पशुसंवर्धन विभागाच्या ज्या बातम्या येतात. त्याची नेमकी काय स्थिती आहे?

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी:-** पशुसंवर्धन विभागाकडील औषध खरेदी संदर्भात जे निवेदन प्राप्त झालेले होते त्यानुसार प्रत्यक्षात पहाणी करुन अहवाल तयार करुन शासनाकडे पाठविलेला आहे. त्यानुसार शासनाकडून पुढील कारवाई होईल. औषधे प्राप्त झालेली आहेत असे दाखवून कंपनीस रक्कम आदा केलेली आहे. प्रत्यक्षात माल प्राप्त झालेला नाही हे उघडकीस आलेनंतर चलनाने पैसे भरलेले आहेत त्याचीही चौकशी सुरु आहे. याच्याशी संबंधीत सर्व अधिकारी व कर्मचारी यांची वेगळयाने चौकशी करुन कारवाई करीत आहोत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** साहित्य येते व त्याचे वाटप आपण करतो. परंतू त्याचा दर्जा काय आहे हे तपासले पाहिजे. साठा नोंदवहीमध्ये साहित्य वाटपामध्ये साहित्य दिलेले नसताना ते दिलेले दाखविले आहे, कांही साहित्य जास्त तर कांही साहित्य कमी आढळून आलेले आहे. अशा पध्दतीने आरोग्य विभागाकडील औषध भांडारची सुध्दा तपासणी व्हायला पाहिजे. वर्षातून एकदा औषध भांडारांची तपासणी केली पाहिजे.

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी :-** भांडार तपासणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी नियमित करतात. आम्ही सुध्दा दौरा करतो तेंव्हा भांडारची तपासणी करतो. यावर सनियंत्रण करणे आवश्यक आहे. सनियंत्रणामधील त्रुटीमुळे हे घडलेले आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** येथून पुढे असे होणार नाही यासाठी काय दक्षता घेतली आहे?

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी :-** जिल्हयामध्ये पशुसंवर्धन विभागाचे औषध भांडार एकच आहे. येथून पुढे प्रत्येक दवाखान्याची औषधाची मागणी असेल त्याप्रमाणे पुरवठा करण्याची दक्षता घेत आहोत. यामध्ये पशुधन विकास अधिकारी यांचेवर जबाबदारी ठेवून औषध पुरवठा करणेत येईल. प्रत्येक दवाखान्याची मागणी घेवून त्यानुसार खरेदी व

वाटप करणेची दक्षता घेणेत येईल. तसेच जो औषध पुरवठा झालेला आहे त्याचा टेस्ट रिपोर्ट आल्याशिवाय वाटप केले जाणार नाही.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** आरोग्य विभागालाही औषध खरेदीबाबत वरीलप्रमाणे दक्षता घेणेस कळविणेत यावे.

**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी** :- आरोग्य विभागाकडील औषध भांडार ऑनलाईन करणेत आलेले आहे.

**श्री. रणधीर नाईक, सदस्य**:- पशुसंवर्धन विभागाकडील औषध साठा ऑनलाईन करणेत यावा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** आरोग्य विभागाप्रमाणे पशुसंवर्धन विभागांनी औषध साठा ऑनलाईन करणेची कार्यवाही करावी. पुढील सभेमध्ये सादरीकरण करावे.

**प्राथमिक शिक्षण विभाग :**

**शिक्षणाधिकारी (प्राथ) :-** यांनी बाबनिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, १५ जूनला शाळा सुरु झाल्या असून पाठयपुस्तके वितरण करणेत आलेली असल्याचे सांगितले. गणवेशाचा निधी वितरीत केलेला असून जुलै महिन्यात सर्व विद्यार्थ्यांना गणवेश मिळतील असे नियोजन केलेले आहे.

**श्री. देवराज पाटील, सदस्य:-** विद्यार्थ्यांना गणवेश एक देणार कि दोन देणार आहात?

**शिक्षणाधिकारी (प्राथ):-** कांही विद्यार्थ्यांना एक व कांहीना दोन गणवेश दिले जातील.

**श्री.रणधीर नाईक,सदस्य:-** पाठ्यपुस्तके प्राप्त होऊनही वाटप केलेले नाही असे होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा**:- पुस्तके वाटप झाले की नाही याचा सर्व शाळांकडून अहवाल मागवून घेणेत यावा. शिक्षकांच्या ड्रेस कोड बद्दल यापूर्वी सांगितले होते त्याप्रमाणे शिक्षकांनी ड्रेस कोड निश्चित करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली कां?

**शिक्षणाधिकारी (प्राथ):-** शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षक ड्रेसकोड मध्ये उपस्थित होते. त्यांचे त्यांनी ड्रेस कोड ठरवून घेतलेला आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** तालुकावाईज काय ड्रेस कोड निश्चित करुन सर्व शिक्षकांना कळवावयाचे होते.

**ग.वि.अ.पं.स.जत** :- तालुक्याचा ड्रेस कोड निश्चित करुन त्याप्रमाणे सर्व शाळांना कळविणेत आलेले आहे.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** विद्यार्थ्यांच्या गळतीची काय स्थिती आहे?

**शिक्षणाधिकारी (प्राथ)** :- विद्यार्थी पटनोंदणी पंधरवडा सुरु आहे तो संपल्यानंतर विद्यार्थी संख्येची स्थिती लक्षात येईल.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** १० पटसंख्या असलेल्या शाळांबाबत काय कार्यवाही करणार आहात?

**शिक्षणाधिकारी (प्राथ):-** १० पटसंख्या असणा-या शाळा बंद करणार नाही. परंतू त्याचे समायोजन करण्यात येणार आहे. पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षक प्रयत्न करीत आहेत.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** खाजगी शाळांच्या मानाने जिल्हा परिषदेच्या शाळांकडे लोकांचा कल जास्त आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथ)** :- कांही शाळा वगळता सर्व शाळांचा दर्जा चांगला आहे, जि.प.कडे शिक्षक संख्या कमी आहे. गतवर्षी प्राथ.शाळांमध्ये ८ वीचा वर्ग सुरु केला पण आपण त्यांना शिक्षक देवू शकलो नाही. ज्या ठिकाणी १० पेक्षा कमी पटसंख्या आहे त्या शाळांचे समायोजन तात्पुरत्या स्वरुपात करणार आहे. नुकत्याच प्राप्त झालेल्या शासन निर्णयापमाणे दि.४ जुलै २०१४ रोजी शाळाबाहय मुलांचे सर्व्हेक्षण करावयाचे आहे. जिल्हा स्तरावर कमिटी स्थापन केलेली आहे. त्यांचेमार्फत सर्व नियोजन केलेले आहे. तालुकास्तर व ग्रामपंचायत स्तरावरही कमिटी स्थापन करावयाची असून सर्व्हेबाबत पूर्ण तयारी झालेली आहे.

**समाजकल्याण विभाग**

**समाजकल्याण अधिकारी :-** यांनी योजनानिहाय प्राप्त निधी व खर्चाची माहिती दिली. वसंत घरकुल योजनेअंतर्गत र.रु.१ कोटी तरतूद असून घरकुल फॉर्म सन्मा.सदस्यांना फॉर्म वाटप केलेले आहे. स्वयंरोजगाराना साहित्य पुरविणे संदर्भात विभागाकडे जी जुनी यादी आहे ती रद्य करणेसंदर्भात स्थायी समितीने ठराव मंजूर करुन द्यावा.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** साहित्य पुरविणे बाबतची जी जुनी यादी आहे ती रद्य करणेपेक्षा यादीतील लाभार्थ्यांनाच लाभ देणेत यावा.

**श्री. रणधीर नाईक, सदस्य:-** त्याच यादीतील लाभार्थ्यांना द्यायला काय हरकत नाही परंतू परत एकदा सदस्यांच्या शिफारशी घ्याव्यात असे वाटते.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** ज्या त्या तालुक्यातील लाभार्थ्यांची यादी त्या तालुक्यातील सदस्यांना देणेत यावी.

**समाजकल्याण अधिकारी :-** एकूण ६२ लोकांची यादी असलेने प्रत्येक सदस्यांना एकच फॉर्म शिफारशीसाठी द्यावा लागणार आहे.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर,अध्यक्षा:-** यादीपेक्षा जास्त लाभार्थ्यांना लाभ देणेसाठी निधी वाढवून देता येईल कां?

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** यादीतील लोकांच्या पेक्षा जादा लोक असतील तर तरतूद वाढवून द्यावी म्हणजे सगळयाच लाभार्थ्यांना लाभ देता येईल.

**कृषि विभाग**

**कृषि विकास अधिकारी :-** यांनी बाबनिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. पीक विम्याबाबत माहिती दिली. हवामान आधारित पीक विमा योजनेची मुदत ३० जून १५ पर्यंत आहे. त्याची मुदत संपत आलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेत फॉर्म ठेवलेले आहेत. राष्ट्रीय कृषिविमा योजनेची मुदत ३१ जुलै २०१५ आहे. यामध्ये अतिवृष्टी, गारपीट, इ.मुळे पीकांचे नुकसान झाले असेल तर याचा लाभ मिळू शकतो. तरी आपल्या परिसरातील सर्व शेतक-यांना याबाबत माहिती द्यावी. खात्यामार्फत प्रचार व प्रसिध्दी करीत आहोत.

स्वीय निधीतील योजनेतून शेतक-यांना चापकटर, ताडपत्री, ५० टक्के अनुदानावर बॅटरी पंप, इले.मोटारी (३ व ५ HP) खरेदी प्रक्रिया चालू आहे. पुरवठा आदेश देण्याचे काम अंतीम टप्प्यात आहे. बायोगॅसचे १२०० उद्दिष्ट असून र.रु.१०२०० अनुदान देणेत येणार आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय बांधकामा सोबत बायोगॅसचा प्रस्ताव केला तर उद्दिष्ट साध्य करणे सोपे होणार असलेने सर्व गट विकास अधिकारी यांनी सहकार्य करावे. विशेष घटक योजनेअंतर्गत अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. चालू वर्षी र.रु. ४ ॥ कोटी नियतव्यय मंजूर आहे. गतवर्षीचे साहित्य संबंधीत लाभार्थींना पोहोच केलेले आहे. ज्या तालुक्याकडे जादा साहित्य शिल्लक होते ते इतर तालुक्यांना वर्ग केलेले आहे. जुलै २०१५ अखेरपर्यंत गोडावूनमध्ये साहित्य शिल्लक रहाणार नाही याचे नियोजन केलेले आहे. लाभार्थी हिस्सा ग.वि.अ.यांचेकडे जमा आहे तो जि.प.च्या ७७३ अकौंटला ताबडतोब भरणेत यावा व चलने कृषि खात्याकडे पाठविणेत यावीत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत सर्व पंचायत समितीकडील गोडावून तपासणीची मोहिम घेतलेली आहे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** बंद पथदिवे दुरुस्त झाले कां?

**कृषि विकास अधिकारी :-** कृषि विभागामार्फत २४१ पथदिवे देणेत आलेले होते. त्यापैकी जे बंद होते ते सर्व दुरुस्त करणेत आलेले आहेत.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती:-** कवठेमहंकाळ तालुक्यातील सौर पथदिवे दुरुस्त झालेले नाहीत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** प्रा.आ.केंद्रात बसविणेत आलेले विंड सोलर बंद होते. संबंधीत एजन्सीला ब्लॅकलिस्टमध्ये घालावयाचे होते त्याचे काय झाले?

**कृषि विकास अधिकारी:-** मेढा कडे सदर कंपनी ब्लॅकलिस्टमध्ये घालणेबाबत कळवीत आहे.

<u>**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**</u>

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु) :-** यांनी आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, जिल्हयात सध्या टंचाई मधून १४ गावांमध्ये १६ टँकर सुरु असल्याचे सांगितले. टंचाईसाठी र.रु.१२३ लाख निधी शिल्लक आहे. मागील तीन महिन्यात निधीची मागणी प्राप्त झालेली नाही. पाणीपट्टी वसुली मधून प्रथम वीज बीलाचा खर्च केला पाहिजे.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** देखभाल दुरुस्तीचे पैसे तालुका लेव्हलला दिले कां?

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु) :-** जिल्हयासाठी र.रु. ३ कोटी प्राप्त झालेले होते. थकीत वीज बील भरणे कामी रु.१ ।। कोटी उपलब्ध झाले होते. त्यातील स्वतंत्र पाणी पुरवठा योजना व प्रादे. पाणी पुरवठा योजनांना दिलेले आहेत.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा :-** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा आढावा फक्त मिटींगमध्येच दिला जातो. कार्यकारी अभियंता यांनी दर आठवडयाला सद्यस्थितीचा आढावा मला समक्ष भेटून देणेचा आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** सर्व खातेप्रमुखांनी मा.अध्यक्षांना वेळोवेळी आढावा द्यावा. जी माहिती मागणी करतील ती ताबडतोब द्यावी.

**श्री. रणधीर नाईक, सदस्य:-** ग्रामपंचायत स्तरावर पाणी पट्टी वसूल केलेनंतर जी रक्कम जमा होते त्यातील ८० टक्के रक्कम जि.प.कडे जमा केली पाहिजे ती झाली कां?

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु):-** स्वतंत्र न.पा.पु.कडील पाणीपट्टी वसुलीचे पैसे जमा केले नाहीत म्हणून ग्रा.पं.देय असलेल्या मुद्रांक शुल्कमधून कपात करुन घेतलेले आहेत. प्रापापुयो मधील गावांची पाणीपट्टी वसूल झालेली आहे परंतू अद्याप जि.प.ला देखभाल दुरुस्तीमध्ये जमा दिसून येत नाही. तरी सर्व ग.वि.अ. यांचेकडून कपात करुन घेतलेले अनुदान जि.प.ला कळविणे आवश्यक आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** चालू वर्षातील जी पाणीपट्टी वसुली होते त्यातील तरी ८० टक्के रक्कम जि.प.कडे जमा केली पाहिजे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):-** सर्व ग्रामसेवकांना याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** याबाबतीत गट विकास अधिकारी यांनी सनियंत्रण केले पाहिजे. ग्रामसेवक सभेमध्ये याचा आढावा घ्यावा.

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु) :-** ग्रा.पा.पु.विभागाकडे दोन शासन निर्णय प्राप्त झालेले आहेत. १) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणासाठी मार्गदर्शक सूचना दिनांक १५ जून २०१५ व २) पाणी पुरवठा योजनांसाठी सौर उर्जा पंपाची तरतूद अंदाजपत्रकात करणेबाबत दिनांक ७ मे २०१५ चे पत्र. तांत्रिक परिक्षणासाठी त्रयस्थ यंत्रणाची नेमणूक करणेसाठी जिल्हयातील शासकीय पडताळणी यंत्रणांशी सल्लामसलत करुन यादी करुन त्यास शासनाची मान्यता घ्यावयाची आहे. यामध्ये वालचंद कॉलेज, गर्व्हमेंट पॉलिटेक्निक कॉलेज यांची नांवे कळविणेत येत आहेत.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** आर.आय.टी. इस्लामपूर कॉलेजचेही नांव कळविणेत यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** संबंधीत सर्व महाविद्यालयांशी चर्चा करुन यादी शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणेत यावी.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** यांत्रिकी विभागाकडे बोअर वर्गणीची किती रक्कम जमा आहे. बोअर दुरुस्ती यांत्रिकी विभागाकडून सुरु आहे कां? दुरुस्तीबाबत रिपोर्टींग होते कां?

**उप अभियंता (यांत्रिकी):-** हातपंप दुरुस्ती वर्गणीसाठी तालुकास्तरावर देखभाल दुरुस्ती अंतर्गत बँक अकौंट उघडलेले आहे. तालुका स्तरावर संक्रमण नोंदवही ठेवलेली असून दुरुस्तीचे काम सतत सुरु आहे. सर्व तालुक्याकडून प्रत्येक महिन्यास अहवाल प्राप्त होतात.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** बोअर वर्गणी किती जमा झाली, किती ग्रामपंचायतींनी दिली, किती ग्रा.पं.भरली नाही अशी माहिती उपलब्ध आहे कां?

**उप अभियंता (यांत्रिकी):-** हातपंप दुरुस्तीचे काम पांच तालुक्यात करतो. एकूण ४८४६ हातपंप व १४१ वीज पंप आहेत. हातपंप दुरुस्तीसाठी र.रु.१००० व वीज पंप दुरुस्तीसाठी रु.५००० भरुन घेतो. सन २०१४-१५ मध्ये रु.१५६.०६ लक्ष एवढी मागणी होती. त्यापैकी २-३ टक्के राहिलेली आहे.बाकी सर्व वसूल झालेली आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** डिमांड आल्यानंतर लगेच दुरुस्ती केली जाते कां?

**उप अभियंता (यांत्रिकी) :-** हातपंप दुरुस्तीचे मजूर सेवानिवृत्त झाल्याने लगेच दुरुस्ती करुन देणेमध्ये अडचणी आहेत. १९८३ साली भरती करणेत आलेली होती. जि.प.स्वीय निधीतून यंत्रणा राबवावयाची आहे. कॉन्ट्रॅक्ट बेस वर तांत्रिक कर्मचारी घेणेस कांही हरकत नसावी.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** बोअर दुरुस्ती युनिटमधील कर्मचारी सेवानिवृत्त व्हायला लागले आहेत. तेंव्हा सातारा, पुणे जिल्हयाप्रमाणे करारपध्दतीवर कर्मचारी घेवून सर्वच तालुक्याचे देखभाल दुरुस्तीचे काम करावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** जोपर्यंत कर्मचारी आहेत तोपर्यंत आपल्या युनिटकडून दुरुस्ती करुन देवू. त्यानंतर ज्यांचे रेट कॉन्ट्रॅक्ट असते त्यांनाच AMC द्यावी.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** सातारा, पुणे जिल्हयात कशा पध्दतीने कर्मचारी घेतलेले आहेत याची माहिती घेवून प्रस्ताव तरी ठेवावा.

**उपअभियंता (यांत्रिकी) :-** डीपीसी अंतर्गत प्रायोगिक तत्त्वावर सोलर पंप चालू केलेला होता. परंतू या पुढे (NRW)पाणी पुरवठा योजनेसाठी ५ HP पर्यंतचा पंप बसत असेल तर सोलर पंपच बसवायचे अशी योजना सुरु करीत आहोत.

**<u>छोटे पाटबंधारे विभाग</u>**

**कार्यकारी अभियंता (छोपावि) :-** यांनी योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन ल.पा.योजना अंतर्गत पाझर तलाव २६ व सिमेंट बंधारे २५ अशी एकूण ५१ कामे असून यासाठी २२७ लक्ष निधी मंजूर आहे. तसेच को.प.बंधारे स्थानिक स्तर साठी १७ कामे असून २०० लक्ष निधी मंजूर आहे. जिल्हा वार्षिक योजनामधून ५ कामे असून ४२७ लक्ष निधी मंजूर आहे. तसेच वेस्टर्न कोलफिल्ड इंडिया लि. मधून ४९ कामे आहेत.

**<u>आरोग्य विभाग</u>**

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** यांनी बाबनिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, पाणी नमुने तपासणीमध्ये १९७ ठिकाणी पाणी दुषित आढळले. दुषित पाण्याचे प्रमाण यापूर्वी ९-१० टक्के असायचे ते आता ६.६५ टक्के पर्यंत खाली आलेले आहे. प्रत्येक वेळी आटपाडी, जत व कवठेमहंकाळ या तीन तालुक्यात दुषित पाण्याचे प्रमाण जास्त